# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 28.08.2012 (का.प.क्र.10) (दिनांक 21.08.2012 रोजीची तहकूब सभा) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

मंगळवार दिनांक 28.08.2012 (का.प.क्र.10) (दिनांक 21/08/2012 रोजीची तहकुब सभा) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.30 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त श्री.रविंद्र निकम, प्र.नगर सचिव तथा विधी सहाय्यक श्री.ओ.सी.शिरसाठ यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
02. स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
03. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
04. स. श्री.आगा खान मिया खान
05. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
06. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
07. स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
08. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
09. स. श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
10. स. श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
11. स. श्री. खान अक्रम करीम खान
12. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
13. स. श्रीमती निलाबाई देविदास जगताप

**विषय क्र. 40 :** (विषय क्र. 33 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 10/08/2012 रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती : विषय क्रमांक 40 स्थगीत ठेवण्यात येतो.**

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 41 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे की, श्री.नवाब अली मुगल अली, वाहन चालक यांच्या पत्नीच्या झालेल्या अपघातावर उपचारापोटी रक्कम रू.1,94,576/- (अक्षरी रू.एक लाख चौऱ्याण्णव हजार पाचशे शहात्तर फक्त) इतका खर्च झालेला आहे.

सदर आजार हा मनपा वैद्यकीय परतावा विनियम परिपत्रक दि.01/12/1994 नुसार "अपघात" यात येतो. त्यानुषंगाने सदर आजारपणावर त्यांनी दाखल केलेल्या वैद्यकीय खर्च रू.1,94,576/- एवढा खर्च झालेला आहे. प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली रक्कम रू.1,66,944/- एवढी आहे. सदरील अनुज्ञेय रकमेच्या 90% रक्कम रू.1,50,249/- (अक्षरी रू.एक लाख पन्नास हजार दोनशे एकोणपन्नास फक्त) पैकी 5% रक्कम रूपये 9,729/- (अक्षरी रूपये नऊ हजार सातशे एकोणतीस फक्त) (एकुण सादर केलेले देयक रक्कम रू.1,94,576/- च्या 5% प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरित र.रू.1,40,520/- (अक्षरी

**रूपये एक लाख चाळीस हजार पाचशे वीस फक्त) रक्कम अदा करण्यास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.**

**करीता प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली रक्कम रू.1,66,944/- च्या 90% रक्कम रू.1,50,249/- (अक्षरी रू.एक लाख पन्नास हजार दोनशे एकोणपन्नास फक्त) या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.**

**मा.सभापती : विषय क्रमांक 41 मंजूर करण्यात येतो.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.नवाब अली मुगल अली, वाहन चालक यांच्या पत्नीच्या झालेल्या अपघातावर उपचारापोटी केलेल्या खर्चापैकी, प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली रक्कम रू.1,66,944/- च्या 90% रक्कम रू.1,50,249/- (अक्षरी रू.एक लाख पन्नास हजार दोनशे एकोणपन्नास फक्त) या वैद्यकीय खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**नगर सचिव,**
**महानगरपालिका औरंगाबाद**